**[4313] – 101**

| Seat No. | |
|---|---|

# वृत्तपत्रविद्या पदविका (मराठी माध्यम) – नवा अभ्यासक्रम परीक्षा, 2013
## (२०१०–११ Pattern)
## प्रश्नपत्रिका क्रमांक – १
## मराठी पत्रकारितेची प्रेरणा, स्वरूप आणि तत्वे

वेळ : २ तास                                                                 एकूण गुण : ५०

*सूचना : १) **सर्व** प्रश्न **आवश्यक.***
*२) **उजवीकडील** गुण अंक दर्शवितात.*

१. अ) बाळशास्त्री जांभेकर यांचे पत्रकारितेल योगदान लिहा. **१५**

**किंवा**

ब) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्रकारितेतील कामगिरीचा आढावा घ्या.

२. अ) नव्या तंत्रज्ञानामुळे मराठी वृत्तपत्रांचे चेहरा बदलला आहे, असे वाटते का ? सोदाहरण स्पष्ट करा. **१५**

**किंवा**

ब) स्वातंत्र्यपूर्व काळात सामाजिक परिवर्तन व प्रबोधनासाठी भरीव कामगिरी केलेल्या वृत्तपत्रांची नावे सांगून त्यांच्या कामाचा आढावा घ्या.

३. टिपा लिहा (कोणत्याही **चार**) : **२०**

अ) प्रभाकर व भाऊ महाजन

ब) केसरी आणि लोकमान्य टिळक

क) सकाळ आणि ना.भि. परुळेकर

ड) ऑनलाईन दैनिके

इ) ‘पुढारी’

फ) वृत्तपत्रांची विश्वासार्हता

ग) वृत्तपत्रीय लेखन व ललित साहित्य

ह) शतपत्रे.

---

**[4313] – 103**

| Seat No. | |
|---|---|

## वृत्तपत्रविद्या पदविका (मराठी माध्यम) – नवा अभ्यासक्रम परीक्षा २०१३
## पशनपत्रिका क्रमांक – ३
## (2010-11 Pattern)
## संपादन, अग्रलेख आणि वृत्तपत्रीय लेखन

वेळ : तीन तास एकूण गुण : १००

*सूचना : १) सर्व प्रश्न आवश्यक.*
*२) उजवीकडील अंक गुण दर्शवितात.*

१. अ) कोणत्याही वृत्तपत्राचा अथवा वृत्तवाहिनीचा संपादक कसा असावा आणि कसा नसावा, या विषयी तुमची मते सविस्तर लिहा. १५

**किंवा**

१. ब) वृत्तपत्राच्या संपादकाने केवळ हस्तिदंती मनोऱ्यात बसून आजूबाजूला घडणाऱ्या घडामोडींवर आपल्या अग्रलेखांतून भाष्य करणे कितपत योग्य आहे ?–सविस्तर विवेचन करा.

२. अ) बातम्यांचे संपादन करताना उपसंपादकाने कोणकोणत्या गोष्टींचे भान ठेवणे आणि कोणती पथ्ये पाळणे आवश्यक असते ? १५

**किंवा**

२. ब) प्रसिद्धीसाठी बातम्यांची निवड करताना किंवा बातम्यांचा प्राधान्यक्रम ठरविताना मुख्य उपसंपादकाने कोणते निकष लावले पाहिजेत ?

३. अ) वृत्तपत्रातील संपादकीय पानाचे महत्त्व त्या पानावरील निरनिराळ्या स्तंभांच्या स्वरूपासह सोदाहरण स्पष्ट करा. १५

**किंवा**

३. ब) वृत्तपत्रीय लेखांचे निरनिराळे प्रकार सांगून या लेखांचे विषय कसे निवडले जातात आणि त्यासाठी माहिती, संदर्भ गोळा करण्याची साधने कोणती, सविस्तर लिहा.

P.T.O.

४.अ) बातमीच्या अग्रभागाचे (लीड किंवा इंट्रो) स्वरूप आणि प्रकार सांगून बातमीच्या आणि लेखाच्या अग्रभागातील फरक स्पष्ट करा. १५

**किंवा**

४. ब) बलात्काराच्या घटनेची बातमी लिहिताना आणि त्या बातमीवर संपादकीय संस्कार करताना कोणती पथ्ये पाळणे आवश्यक असते ?

५. टिपा लिहा (कोणत्याही **चार**) : २०

अ) वाचकांची पत्रे

ब) व्यंगचित्रे आणि अर्कचित्रे

क) अग्रलेखाची भाषा आणि शैली

ड) मुलाखतीचे तंत्र आणि मंत्र

इ) स्तंभलेखनाचे स्वरूप आणि शैली

प) उपसंपादकाची बहुश्रुतता

६. महाराष्ट्रातील दुष्काळाच्या संदर्भात तुम्हाला मुख्यमंत्र्यांची मुलाखत घ्यावयाची असल्यास त्याची तयारी कशी कराल ? संभाव्य प्रश्न व आराखडा स्पष्ट करा. १०

७. खालील मजकुराचे मराठीत भाषांतर करून त्याला योग्य शीर्षक द्‌या. १०

BHOPAL : With Assembly elections due in Madhya Pradesh in November, senior Congress leader Ajay Singh wants the party to distribute tickets to the candidates well in advance.

"Yes, party candidates in Madhya Pradesh should be declared in advance...much before the polls, as elections are due in November 2013", Ajay said, when asked whether party candidates should be declared much earlier to avoid last minute confusion that leads to infighting among aspirants.

"It will be in the interest of the party to declare the candidates well in advance as this will also give them sufficient time for campaigning", said Ajay, the Leader of Opposition in State Assembly. The Congress leader also said that the selection of candidates should be made by taking into account the winnability factor.

Corruption, problems of power, roads and law and order will be the major issues during the Assembly polls as the BJP government, specially its Home Minister Uma Shankar Gupta, has "failed" in controlling the rising crime graph in the state, he said.

---

| Seat No. | |
|---|---|

**वृत्तपत्रविद्या पदविका (मराठी माध्यम) – नवा अभ्यासक्रम परीक्षा, २०१३**
**प्रश्नपत्रिका क्रमांक – ४**
**(२०१०–११ Pattern)**
**संज्ञापनशास्त्राची ओळख आणि माध्यम विषयक कायदे**

वेळ : २ तास एकूण गुण : ५०

*सूचना : १) **सर्व** प्रश्न **आवश्यक.***
*२) **उजवीकडील** गुण अंक दर्शवितात.*

१. अ) मानवी जीवनातील संज्ञापनाचे महत्त्व विविध उदाहरणांसह स्पष्ट करा. **१५**

**किंवा**

१. आ) संज्ञापन प्रक्रियेतील महत्त्वाचे घटक उदाहरणांसह स्पष्ट करा.

२. अ) भारतीय राज्यघटनेची प्रमुख वैशिष्ट्ये सांगा. **१५**

**किंवा**

२. आ) भारतीय राज्यघटनेतील भाषण अभिव्यक्ती स्वातंत्र्य व त्यावरील वाजवी बंधने स्पष्ट करा.

३. टिपा लिहा (कोणत्याही **चार**) : **२०**

क) शाब्दिक संज्ञापन

ख) प्रसारमाध्यमांचा बदलता ग्राहकवर्ग

ग) गट संज्ञापन

घ) मूलभूत कर्तव्ये

च) संसदेचा विशेषअधिकार

छ) वृत्तपत्र व आणीबाणी

ज) स्वसंज्ञापन किंवा आत्मसंवाद

झ) वृत्तपत्रमंडळाचे कार्य व उद्देश.

---

[4313] – 106

| Seat No. | |
|---|---|

# वृत्तपत्रविद्या पदविका (मराठी माध्यम) – नवा अभ्यासक्रम परीक्षा, २०१३
## प्रश्नपत्रिका क्रमांक – ६
## (2010-11 Pattern)
## चालू घडामोडी आणि आधुनिक महाराष्ट्र

वेळ : २ तास एकूण गुण : ५०

*सूचना : १) **सर्व** प्रश्न **आवश्यक.***
*२) **उजवीकडील** गुण अंक दर्शवितात.*

१. अ) केंद्रातील संयुक्त पुरोगामी आघाडी सरकार आर्थिक सुधारणा घडविण्यात यशस्वी झाले आहे, असे तुम्हाला वाटते का ? तुमचे मत सोदाहरण स्पष्ट करा. १५

**किंवा**

आ) आगामी लोकसभा निवडणुकीत प्रमुख राजकीय पक्षांची भिस्त विचारधारेपेक्षा वैयक्तिक करिष्म्यावर जास्त असेल, या विधानाची चर्चा करा.

२. अ) बलात्कारासारखे गुन्हे रोखण्यासाठी सरकारने कोणते उपाय योजले पाहिजेत, याविषयी भाष्य करा. १५

**किंवा**

आ) सहकारी चळवळीचे महाराष्ट्राच्या विकासातील स्थान सोदाहरण स्पष्ट करा.

३. पुढील व्यक्ती अलीकडे कोणत्या कारणासाठी चर्चेत आल्या यासंबंधी माहिती द्या. (कोणत्याही **दोन**) : १०

क) ऑस्कर प्रिस्टोरियस

ख) आशीष नंदी

ग) विजय केळकर

घ) भालचंद्र नेमाडे

छ) बराक ओबामा

P.T.O.

४. टिपा लिहा (कोणत्याही **दोन**) : **१०**

अ) महाराष्ट्रातील विकासाचा प्रादेशिक असमतोल

ब) मराठी साहित्य संमेलन

क) मराठी चित्रपटांची बदलती व्यावसायिकता

ड) राज्याचे औद्योगिक धोरण

इ) राष्ट्रीय दहशतवादविरोधी केंद्र (एनसीटीसी)

---

*B/I/13/250*

| Seat No. | |
|---|---|

**Diploma in Journalism (Marathi Medium) Examination, 2013**

**प्रश्नपत्रिका क्र. ४ (Old Course)**

**अ) संपादन, अग्रलेख व वृत्तपत्रीय लेखन (थिअरी)**

Time : 3 Hours Max. Marks : 100

***सूचना :*** *१) **सर्व** प्रश्न **अनिवार्य**.*
*२) **उजवीकडील** अंक गुण दर्शवितात.*

१. अ) वृत्तदालनाची रचना स्पष्ट करून त्यातील वृत्तसंपादक आणि उपसंपादक यांचे स्थान, महत्त्व आणि कार्य सविस्तर सांगा. २०

**किंवा**

आ) वृत्तसंस्थेकडून किंवा ग्रामीण बातमीदाराकडून आलेल्या बातमीवर उपसंपादकाला कोणकोणते संस्कार करावे लागतात, हे स्पष्ट करा.

२. अ) वृत्तलेखाचे प्रकार स्पष्ट करून त्यासाठी संदर्भ कसे गोळा केले जातात ते सांगा. २०

**किंवा**

आ) प्रभावी अग्रलेखामुळे त्या वृत्तपत्राला चेहरा मिळतो, या विधानाची साधक-बाधक चर्चा करा.

३. टिपा लिहा (कोणत्याही **चार**) : २०

१) बातमी केव्हा नाकारावी ?

२) भाषांतर करताना ध्यावयाची काळजी

३) वृत्तसंस्था आणि वृत्तपत्रे यांची कार्यपद्धती

४) वाचकांचा पत्रव्यवहार

५) बातमीच्या अग्रभागाचे प्रकार

६) शैलीपुस्तिकेचे महत्त्व

७) पुरवण्यांचे बदलते स्वरूप

८) वृत्तपत्रातील छायाचित्रांचे महत्त्व.

४. पुण्यातून प्रसिद्ध होणाऱ्या दैनिकाच्या रविवार पुरवणीचे तुम्ही संपादक आहात. जर्मन बेकरीतील स्फोटाच्या अनुषंगाने दहशतवादाचे सावट या विषयाचे विविध पैलू विचार घेऊन, पुरवणीचे नियोजन तुम्ही कसे कराल ? या पुरवणीचा संकल्पना आराखडा स्पष्ट करा. १०

५. पुढील बातम्यांमधून काही बातम्या निवडून वृत्तपत्राच्या पान १ ची रचना करा. त्यासाठी डमी शीटचा वापर करावयाचा आहे. छायाचित्र, तापमान, व्यंगचित्र, जाहिरात यांच्या जागाही दाखविणे आवश्यक आहे. १०

१) बंगलोरमधील आगीत नऊ मृत्यू

२) खंडाळा घाटात टँकर आगीत भस्मसात

P.T.O.

३) आत्मघातकी हल्ल्यात पाकिस्तानात १२ ठार

४) कोथरूडमध्ये दूषित पाण्याने अतिसाराची साथ

५) संसदेतही भडकली महागाईची आग

६) पिंपरी-चिंचवड शहरातही प्लॉस्टिक पिशव्यांवर बंदी

७) जर्मन बेकरीतील बॉम्बस्फोट : एटीएसला धागेदोरे मिळाल्याचा दावा

८) दरोडेखोरांचा औरंगाबाद जिल्ह्यात तीन तास धुमाकूळ

९) ग्वाटेमालाला भूकंपाचा धक्का

१०) धमकीच्या दूरध्वनीमुळे कत्राटदाराची आत्माहत्या

६. वार्ताहराने पाठविलेल्या पुढील मजकुराचे संपादन व मुद्रितशोधन करून प्रसिद्धीसाठी बातमी तयार करा. बातमीला योग्य शीर्षक द्या. १०

**सोलापुर :** येथिल शासकिय रुग्णालयायातील प्रसुतीगृहातून अवध्या तीन दिवसांपूर्वी जन्मलेल्या बाळाला अज्ञात महीलांनी पळवून नेल्याची घटना घडली. ही घटना सकाळी ८ ते ८.३० च्या दरम्यान घडली. या घटनेमुळे सगळीकडे खळहळ उडाली आहे, रुग्णालय प्रशासनही त्यामुळे हादरले आहे. रुग्णालयातून बाळाचे अपहरण झाल्याचे कळल्यानंतर बाळाच्या आइने हंबरडा फोडला. घटनेचे वृत्त कळताच वरीश्ठ पोलीस अधिकारी व पोलिसांचा ताका घटनास्थळी आला. दोन महिलांनीच बाळाचे आपहारण केल्याचे प्राथमिक तपासात कळले आहे. रुग्णालयातील इतर पेशंटनी सांगीतल्यानुसार त्यांची चित्रे तयार करण्यात आली आहेत. यापूर्वीही अशीच घटना याच रुग्णालयात घडली होती. आचच्या गटनेमुळे त्या घटनेची अनेकांना आठवन झाली. यामुळे पुन्हा एकदा रुग्णालयातील बाळांच्या सुरक्षीततेचा प्रश्न एरणीवर आला आहे. शहरातील जोशी गल्लीत राहणेरे मारुती चौगुले (वय ३०) हे हमालीचे काम करातात. त्यांची पत्नी राधाबाई हिच्या प्रसुतीचा खर्च परवडणार नसल्याने मारुती यांनी तिला शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. प्रसूतीपपूर्व उपचारही राधाबाईनी शासकीय रुग्णालयातच घेतलेहोते. गेल्या शनिवारी ती बाळंतीण झाली. तिला मूलगा झाला. त्यामुले सर्व कुटुंबिय आनंदीत होते.

७. पुढील बातमीचे अर्थवाही भाषांतर करा व योग्य शीर्षक द्या. (शब्दकोश वापरण्याची मुभा आहे) : १०

**Bankura** : Blood continues to be spilt in West Bengal amid ceasefire offers and counteroffers by the Centre and CPI (Maoist). Rabilochan Mitra, Inspector-in-Charge of Sarenga Police Station in Bankura, was shot dead by Maoists on Wednesday night. This is the first instance of a police officer of the rank of inspector being killed by Maoists in West Bengal after Centre-State combined forces were pressed into service in the state on June 18, 2009. The clash ensued after Maoists attacked the residence of Tarashankar Patra, a local CPI (M) leader. Patra was shot in the leg. The Sarenga police station is close to Patra's residence. After getting a phone call about the attack Mitra reached Patra's residence and engaged the Maoists in a fight. Initially, the Maoists retreated. But they retaliated and a bullet hit Mitra in his chest. Police claim to have gunned down a Maoist called Jannath Duley. One rebel is injured and has been admitted to the hospital. Patra, too, is in hospital and is being treated for bullet injury. Bankura is one of the three districts of Bengal that are dominated by Maoists. The other two being West Midnapore and Purulia. The West Bengal administration has decided to expand the list of Maoist-affected police stations to 28 from 21 in these three districts. The seven stations added to the list is supposed to get a company of state armed police by next week.

आसत क्रमांक :

[4313] – 7

Seat No.

**Diploma in Journalism (Marathi Medium) Examination, 2013**
**प्रश्नपत्रिका क्र. ७ (Old Course)**
**नभोवाणी व दूरचित्रवाणी पत्रकारितेची ओळख**

वेळ : २ तास                                                                 एकूण गुण : ५०

*सूचना : १) सर्व प्रश्न अनिवार्य.*
*२) उजवीकडील अंक गुण दर्शवितात.*

१. अ) भारतातील नभोवाणी विस्ताराचा सविस्तर आढावा घ्या. **१५**

**किंवा**

आ) नभोवाणी पत्रकारिता, दूरचित्रवाणी पत्रकारिता आणि मुद्रित पत्रकारिता यातील फरक सोदाहरण स्पष्ट करा.

२. अ) दूरचित्रवाणीसाठीचे वृत्तलेखन हे वर्तमानपत्राच्या वृत्तलेखनापेक्षा वेगळे असते, उदाहरणासह स्पष्ट करा. **१५**

**किंवा**

आ) भारता सारख्या विकसनशील देशात दूरचित्रवाणीवाहिनीचा वापर रचनात्मक पद्धतीने कसा करता येऊ शकतो ते तुमच्या शब्दांत सविस्तर सांगा.

३. टिपा लिहा (कोणत्याही **चार**) : **२०**

१) नभोवाणीच्या बातमीपत्रातील व्हॉईस रिस्पॉन्स

२) नभोवाणी बातमीपत्राचे सादरीकरण

३) प्रसार भारती

४) एफ.एम. वाहिन्या

५) वृत्तनिवेदक

६) वृत्तवाहिन्या.

**[4313] – 1**

**Diploma in Journalism (Marathi Medium) Examination, 2013**
**प्रश्नपत्रिका क्र. १ (Old Course)**
**मराठी पत्रकारितेचा इतिहास, आधुनिक भारत व महाराष्ट्र**

वेळ : ३ तास एकूण गुण : १००

*सूचना : 1) सर्व प्रश्न अनिवार्य.*
*2) उजवीकडील **अंक** गुण दर्शवितात.*

१. अ) स्वातंत्र्यपूर्व काळात राजकीय आणि सामाजिक प्रबोधनाच्या दृष्टीने मराठी वृत्तपत्रांनी बजाविलेल्या कामगिरीचा आढावा घ्या. २०

**किंवा**

आ) 'मूकनायक', 'जनता' आणि 'बहिष्कृत भारत' या वृत्तपत्रांच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या कार्याची चर्चा करा. २०

२.अ) 'मराठी वृत्तपत्रसृष्टीत 'ज्ञानप्रकाश' ने आपला स्वतंत्र ठसा उमटविला होता आणि त्याचे श्रेय कै.कृ.ग. तथा काकासाहेब लिमये यांना द्यावे लागेल,' या विधानाचे सविस्तर स्पष्टीकरण करा. २०

**किंवा**

आ) 'चित्रवाहिन्यांशी कराव्या लागणाऱ्या स्पर्धेमुळे आजची मराठी वृत्तपत्रे वेगाने बदलत आहेत.' उदाहरणे देऊन चर्चा करा. २०

३. अ) भाषिक अस्मितेच्या राजकारणामुळे मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष होत आहे, असे तुम्हाला वाटते का ? साधकबाधक चर्चा करा. २०

**किंवा**

आ) महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलाची कारणे व त्याचे स्वरूप स्पष्ट करा. तसेच हा असमतोल दूर करण्यासाठी राच्य शासनाने कोणते उपाय योजले ते सांगा. २०

४. अ) भारत व चीन यांच्यातील आर्थिक व राजनैतिक संबंधांचा आढावा घ्या. २०

**किंवा**

आ) भारतातील प्रमुख राजकीय पक्ष कोणते ? देशातील विरोधी पक्षांच्या गेल्या दहा वर्षातील कामगिरीवर भाष्य करा. २०

३. टिपा लिहा (कोणत्याही **चार)** : २०

१) दर्पण आणि बाळशास्त्री जांभेकर

२) 'काळ' कर्ते परांजपे

३) प्रमुख जिल्हा वृत्तपत्रे

४) महाराष्ट्रातील विजेचा प्रश्न

५) कै. ना. भ. परुळेकर आणि 'सकाळ'

६) राज्याचे औद्योगिक धोरण

७) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था

८) साखर उद्योगापुढील प्रश्न.

---

**[4313] – 102**

| Seat No. | |
|---|---|

**वृत्तपत्रविद्या पदविका (मराठी माध्यम) नवा अभ्यासक्रम परीक्षा, 2013**

**प्रश्नपत्रिका क्रमांक – 2 (2010 – 11 Pattern)**

**वृत्तसंकलन व वृत्तलेखन**

Time : 3 Hours Max. Marks : 100

*सूचना : 1) सर्व प्रश्न आवश्यक.*

*2) उजवीकडील अंक गुण दर्शवितात.*

1. अ) जबाबदार बातमीदारी म्हणजे काय ? **20**

**किंवा**

ब) बातम्या कोठून मिळतात याची सविस्तर चर्चा करा.

2. अ) वार्तामूल्यांचे बातमीदारीच्या दृष्टीने महत्त्व काय ? **20**

**किंवा**

ब) बातमीदार वृत्तपत्रासाठी कच्चा माल आणतो या विधानाची चर्चा करा.

3. अ) चांगली बातमी मिळविण्यासाठी बातमीदाराने कोणती कौशल्ये आत्मसात काण्याची गरज असते ? **20**

**किंवा**

ब) बातमीचा अग्रभाग कमीत कमी शब्दांत लिहिलेला असावा असे का म्हटले जाते हे स्पष्ट करा. आणि अग्रभागाचे विविध प्रकार सांगा.

4. अ) बातमी लिहिताना उलट्या त्रिकोनाची (इन्व्हर्टेड पिऱ्यामिड) पद्धत वापरणे अनिवार्य आहे का ? **15**

**किंवा**

ब) लोकरुची वार्ता म्हणजे काय ?

5) पुढील पैकी कोणत्याही एका विषयावर दीडशे शब्दांत लोकरुची बातमी लिहा. **10**

अ) पतीच्या निधनानंतर ट्रक चालवून संसाराला हातभार लावणारी महिला

ब) अपंगत्वावर मात करून कळसूबाई शिखर सर करणारा युवक

क) दुष्काळातही पक्ष्यांच्या पाण्यासाठी सोय करणारा शेतकरी

**P.T.O.**

6. टिपा लिहा (कोणत्याही **तीन**) : **15**

अ) अपेक्षित बातम्या

ब) वृत्तपत्रांचे प्रकार

क) बातमीदाराची विश्वासार्हता

ड) विज्ञानपत्रकारितेची गरज

इ) वेळमर्यादा

फ) बातमीदाराचे संदर्भ ग्रंथालय.

---

*B/I/13/250*

**[4313] – 105**

| Seat No. | |
|---|---|

**वृत्तपत्रविद्या पदविका (मराठी माध्यम) – नवा अभ्यासक्रम परिक्षा, २०१३**

**प्रश्नपत्रिका क्रमांक – ५**

**(२०१०–११ Pattern)**

**नभोवाणी, दूरचित्रवाणी आणि वेब पत्रकारितेची कौशल्ये**

वेळ : २ तास एकूण गुण : ५०

*सूचना : १) **सर्व** प्रश्न **आवश्यक.***
*२) **उजवीकडील** गुण अंक दर्शवितात.*

१. अ) नभोवाणीसाठी वृत्तलेखन, वार्तांकन आणि वृत्तवाचन यांची वैशिष्ट्ये सांगा. १५

**किंवा**

आ) भारतातील नभोवाणीच्या विकासाचे ठळक टप्पे विशद करा. १५

२. अ) नभोवाणी, दूरचित्रवाणी व वेब (इंटरनेट) पत्रकारिता यांच्यातील फरक सांगा. १५

**किंवा**

आ) दूरचित्रवाणी माध्यमाची वैशिष्ट्ये सांगून वृत्तपत्र आणि नभोवाणी या दोन माध्यमांपेक्षा ते कसे वेगळे आहे हे उदाहरणांसह स्पष्ट करा. १५

३. टिपा लिहा (कोणत्याही **चार**) : २०

क) प्रसारभारती

ख) एफएम वाहिन्या

ग) नभोवाणी मुलाखतीची वैशिष्ट्ये

घ) दूरचित्रवाणी वाहिनीवरील रिॲलिटी शो

च) वृत्तवाहिन्यांमधील वाढती स्पर्धा

छ) दूरचित्रवाणीवरील चर्चात्मक कार्यक्रम

ज) वेबपत्रकारितेसाठी आवश्यक कौशल्ये

झ) इंटरनेटचा इतिहास.

———————

**[4313] – 107**

| Seat No. | |
|---|---|

**वृत्तपत्रविद्या पदविका (मराठी माध्यम) – नवा अभ्यासक्रम परीक्षा, 2013**
**प्रश्नपत्रिका क्रमांक – 7**
**(2010-11 Pattern)**
**जाहिरात व जनसंपर्क**

Time : 2 Hours Max. Marks : 50

*सूचना :१) **सर्व** प्रश्न **आवश्यक.***
*२) **उजवीकडील** अंक गुण दर्शवितात.*

१. अ) बँकेच्या नव्या गृहकर्ज योजनेची माहिती सांगण्यासाठी जनसंपर्क अधिकारी म्हणून तुम्ही पत्रकार परिषद कशी आयोजित कराल ? १५

**किंवा**

१. ब) सध्याच्या बदलत्या काळात जनसंपर्काचे साधन म्हणून गृहपत्रिकेचे कार्यही बदलले आहे, या विधानाची सोदाहरण चर्चा करा.

२. अ) माध्यमांवरील जाहिरातीचे वर्चस्व वाढत आहे, त्यामुळे लोकांच्या हितासाठी माध्यमे व जाहिराती यांचे नाते नव्याने ठरविण्याची आवश्यकता आहे या विधानाची चर्चा करा. १५

**किंवा**

२. ब) कार्पोरेट कंपन्या जाहिराती का करतात हे उदाहरणांसह स्पष्टीकरण द्या.

३. टिपा लिहा (कोणत्याही **चार**) : २०

अ) जनसंपर्क आचारसंहिता (अथेन्स कोड)

आ) जनसंपर्कातील नेटवर्किंग म्हणजे इंटरनेटवर काम करणे नव्हे

इ) जाहिरात आणि जनसंपर्क यातील संबंध

ई) जाहिरातींमध्ये मुलांचा वापर

उ) पत्रकारिता विरुद्ध जाहिरात

ऊ) जाहिरातींचे महत्त्व

ऋ) इंटरनेटवरील जाहिराती

---